आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, ४ था मजला,
सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डीमेलो रोड, फोर्ट,
मुंबई – ४०० ००१

# सहाय्यक प्राध्यापक पदासाठी तात्पुरत्या नेमणूका

शासकीय आयुर्वेद महाविद्यालयांतील महाराष्ट्र आयुर्वेद सेवा, गट – ब संवर्गातील विविध विषयाच्या सहाय्यक प्राध्यापक पदांवर १२० (एकशे वीस) दिवसांचे कालावधीसाठी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करण्यासाठी इच्छूक व पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. तात्पुरत्या नेमणूकीसाठी उपलब्ध असलेली पदे, शैक्षणिक अर्हता, मुलाखतीचे दिनांक, ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची पध्दत व अन्य सविस्तर तपशील आयुष संचालनालयाच्या www.mahayush.gov.in या वेबसाईवर आणि रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु), वरळी, मुंबई या महाराष्ट्र शासनाच्या शासकीय आयुर्वेद महाविद्यालयाच्या www.ayurvedinstitute.com या वेबसाईटवर तसेच महाराष्ट्र शासनाच्या www.Maharashtra.gov.in या वेबसाईटवर दिनांक ५.११.२०१५ पासून उपलब्ध आहे.

अर्ज करावयाची शेवटची तारीख दिनांक २१.११.२०१५ आहे.

संचालक
आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, ४ था मजला,
सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डीमेलो रोड, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१

## सहाय्यक प्राध्यापक (तात्पुरत्या स्वरुपाची नेमणूक) पदासाठी जाहिरात

संदर्भ :- १) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय क्रमांक आयुसे/२००८/प्र.क्र.२१०/आयु-१, दिनांक ३०.०८.२००८.
२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन पत्र क्रमांक आयुसे-१२१४/प्र.क्र.१९५/आयु-१, दिनांक १४.१०.२०१५.

शासकीय आयुर्वेद महाविद्यालयांतील महाराष्ट्र आयुर्वेद सेवा, गट-ब संवर्गातील विविध विषयाच्या सहाय्यक प्राध्यापक पदांवर १२० दिवसांचे कालावधीसाठी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करण्यासाठी इच्छूक व पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. तात्पुरत्या नेमणूकीसाठी उपलब्ध असलेल्या पदांचा विषय व ठिकाणनिहाय तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | विषय | एकूण पदसंख्या | खुला प्रवर्ग | अनु. जाती | अनु. जमाती | विजा (अ) | उपलब्ध पदांचा तपशील | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | ठिकाण | पदसंख्या |
| १ | शरिररचना | २ | १ | ० | १ | ० | मुंबई | १ |
| | | | | | | | नांदेड | १ |
| २ | रसशास्त्र | ३ | २ | ० | ० | १ | नांदेड | २ |
| | | | | | | | उस्मानाबाद | १ |
| ३ | रोगनिदान | २ | १ | ० | १ | ० | मुंबई | २ |
| ४ | स्वस्थवृत्त | १ | ० | १ | ० | ० | उस्मानाबाद | १ |
| ४ | अगदतंत्र | १ | १ | ० | ० | ० | मुंबई | १ |
| ५ | प्रसुतितंत्र | १ | १ | ० | ० | ० | नांदेड | १ |
| ६ | कौमारभृत्य | २ | २ | ० | ० | ० | मुंबई | १ |
| | | | | | | | नांदेड | १ |
| ७ | शालाक्यतंत्र | १ | ० | १ | ० | ० | उस्मानाबाद | १ |
| | एकूण | १३ | ८ | २ | २ | १ | | १३ |

१) वरील पदसंख्येत कमी किंवा अधिक असा तसेच ठिकाणांमध्ये बदल होण्याची शक्यता आहे.
२) पद भरणे किंवा ना भरणे हा अधिकार संचालक, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना आहे.
३) रोगनिदान (अनुक्रमांक ३) विषयातील २ पदांपैकी १ पद सद्यस्थितीत रिक्त असून १ पद कार्यरत अध्यापकाला सहयोगी प्राध्यापक पदावर पदोन्नतीने नेमणूक मिळाल्यानंतर संभाव्य रिक्त होणारे पद आहे. त्यामुळे संभाव्य रिक्त पदावरील नियुक्ती, ज्यावेळी रिक्त पद उपलब्ध होईल, त्यानंतर करण्यात येईल.

सदर पदे खालील अटी व शर्तीचे अधिन भरण्यात येतील.

| | | |
|---|---|---|
| वेतनश्रेणी | :- | पे बॅन्ड १५६००-३९१००/- अधिक ग्रेड वेतन रुपये ६०००/- अधिक नियमाप्रमाणे अनुज्ञेय असलेले भत्ते. |
| वयोमर्यादा | :- | दिनांक २१.११.२०१५ रोजी ४० वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीय उमेदवारांसाठी ५ वर्ष शिथिलक्षम. |
| शैक्षणिक अर्हता | :- | १) महाराष्ट्र वैद्यकिय व्यवसायी अधिनियम, १९६१ मधील अनुसूची अ, अ-१, ब आणि क मध्ये नमूद केलेली आयुर्वेद शास्त्रातील पदवी किंवा भारतीय चिकित्सा केंद्रिय परिषद, अधिनियम १९७० मधील समकक्ष अर्हता, आणि<br>२) सांविधिक विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संथेची संबंधित आयुर्वेदिक विषयातील पदव्युत्तर पदवी.<br>३) मराठी, हिंदी, इंग्रजी व संस्कृत भाषेचे पुरेसे ज्ञान असावे. |
| इतर शैक्षणिक अर्हता | :- | १) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर A स्तर किंवा B किंवा C स्तरांपैकी कोणताही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य, उच्च व तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र. |
| इतर अटी | :- | १) उमेदवारास कायमस्वरुपी शासकीय कर्मचा-याचे अन्य कुठलेही लाभ अनुज्ञेय नसून त्यांना सदर पदावरील नियूक्तीसाठी कायमस्वरुपी हक्क सांगता येणार नाही व १२० दिवसांच्या कालावधीनंतर किंवा सदर पदावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून नियमित उमेदवाराची नियुक्ती झाल्यास यापैकी जे काही अगोदर घडेल त्या तारखेला तात्पुरती नेमणूक आपोआप संपुष्टात येईल.<br>२) उमेदवार महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम नियम क्रमांक २८) अंतर्गत नोंदणीकृत असावा.<br>३) मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या पदावर अर्ज करणा-या उमेदवाराने जाती प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र व अद्ययावत नॉन-क्रिमीलेअरची साक्षांकित प्रत अपलोड करावी. सदर प्रमाणपत्रे अपलोड केलेली नसल्यास सदर उमेदवारांचा गुणवत्ता यादी व मुलाखतीसाठी विचार केला जाणार नाही.<br>४) उमेदवारास नियमित नियुक्त आणि कार्यरत असलेल्या अध्यापकांप्रमाणे पदाच्या कर्तव्य आणि जबाबदा-या पार पाडाव्या लागतील.<br>५) नियमित नियुक्त आणि कार्यरत अध्यापकांप्रमाणेच उमेदवारांचे कामाचे तास राहतील.<br>६) उमेदवारास सार्वजनिक सुट्टी आणि रविवार व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारची रजा अनुज्ञेय राहणार नाही.<br>७) उमेदवारास तात्पुरती नियुक्ती सोडावयाची झाल्यास किमान १ महिना अगोदर संबंधित अधिष्ठाता यांचेकडे रीतसर अर्ज करुन माहिती देणे आवश्यक राहील, अन्यथा १ महिन्याचे वेतन शासनास जमा करावे लागेल. |

| | | |
|---|---|---|
| | | ८) उमेदवारांचे काम समाधानकारक आढळल्यास व त्यावेळी संबंधीत पद रिक्त असल्यास, १२० दिवसांच्या कालावधीची तात्पुरती नेमणूक (शासनाचे अनुमतीने) पुढे १२० दिवसांपर्यत तात्पुरती नेमणूक म्हणूनच चालू ठेवण्यात येईल.<br>९) निवड झालेले उमेदवार आयुष संचालनालयाच्या महाराष्ट्रातील कोणत्याही महाविद्यालयात नियुक्तीस अथवा बदलीस पात्र राहतील.<br>१०) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ च्या अटी व वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१०००/ प्र.क्र.७०/सेवा-५, दिनांक ११.०८.२००० नुसार विहित अटी लागू राहतील. याबाबतचे प्रतिज्ञापत्र मुलाखतीच्या वेळी असणे अनिवार्य आहे.<br>११) नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांना शासनाकडून व्यवसायरोध भत्ता अनुज्ञेय करण्यात येणार असल्यामुळे त्यांना खाजगी व्यवसाय करता येणार नाही. असे आढळल्यास, त्याची सेवा तात्काळ संपुष्टात आणून त्यांच्याविरुध्द नियमानुसार कारवाई करण्यात येईल. |
| ऑनलाईन अर्ज करण्यासाठी उमेदवारांसाठी सुचना | :- | १) उमेदवारांनी संचालनालयाच्या www.mahayush.gov.in या संकेतस्थाळामार्फतच ऑनलाईन अर्ज करणे बंधनकारक आहे. अन्य कोणत्याही मार्गाने अर्ज स्विकारले जाणार नाहीत.<br>२) उमेदवारांकडे स्वतःचा अधिकृत email-id नसेल तर ऑनलाईन अर्ज करण्यापूर्वी नवीन email-id तयार करणे आवश्यक आहे.<br>३) ऑनलाईन अर्ज भरल्यावर उमेदवाराने स्टेट बॅंक ऑफ इंडियाच्या चलनाच्या दोन प्रिंटआऊट घ्याव्यात. प्रिंट आऊट घेतलेले चलन स्टेट बॅंक ऑफ इंडियाच्या जवळच्या शाखेमध्ये पुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी घेऊन जावून उमेदवाराने योग्य ते परिक्षा शुल्क भरावे. सदर परिक्षा शुल्क स्टेट बॅंक ऑफ इंडिया, मुख्य शाखा, फोर्ट, मुंबई मुंबई येथील आयुष संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचे बॅंक खाते क्रमांक ३२३१२८२८३९८ मध्ये रोखीने भरावे.<br>४) उमेदवाराने शुल्क अदा केलेल्या चलनाची प्रत Journal No./Transaction ID सह बॅंकेकडून प्राप्त करुन घ्यावी. उमेदवाराने बॅंकेत रक्कम जमा केल्यानंतर उमेदवार ऑन लाईन अर्ज submit करण्यास पात्र ठरेल. उमेदवाराने संचालनालयाच्या संकेतस्थळावरील पृष्ठावर परत भेट द्यावी व ऑनलाईन अर्जासाठी User Name & Password सह Login करावे.<br>५) तद्नंतर User Name & Password सह Login करुन अद्यावत Journal No./Transaction ID आणि स्कॅन फोटाग्राफ व सहीसह Upload करावे. उमेदवाराने Journal No./Transaction ID यशस्वीरित्या भरल्यानंतर अर्ज स्विकृत होईल. उमेदवाराने या अर्जाची संदर्भासाठी प्रिंट काढावी. Journal No./Transaction ID योग्यरित्या न भरल्यास अर्ज स्विकृत होणार नाही.<br>६) अर्जदाराने अर्जासोबत जोडावयाची आवश्यकती सर्व प्रमाणपत्रे साक्षांकित करुन अपलोड करावीत. प्रमाणपत्रे अपलोड केलेली नसल्यास, सदर अर्ज स्विकृत केला जाणार नाही.<br>७) अर्जदाराने कोणत्याही परिस्थितीत अर्जाचा फॉर्म तसेच अन्य |

| | | |
|---|---|---|
| | | कागदपत्रे या कार्यालयात पाठवू नयेत. पाठविल्यास त्याची कोणतीही दखल या कार्यालयाकडून घेतली जाणार नाही.<br>८) उमेदवाराने आवश्यक बाबी व शैक्षणिक अर्हता जाहिरातीत नमूद केल्यानुसार काळजीपूर्वक वाचून अर्ज भरावा.<br>९) ऑनलाईन अर्ज भरताना उमेदवाराची कोणतीही चूक झाल्यास ती या संचालनालयाकडून दुरुस्त होऊ शकणार नाही व त्याबाबतची कोणतीही जबाबदारी हे संचालनालय स्विकारणार नाही.<br>१०) बॅंक चलनाने भरण्यात येणारे शुल्क नापरतावा पध्दतीच्या स्वरुपात आहे. त्यामुळे एकदा शुल्क भरल्यानंतर अर्जदारास कोणत्याही परिस्थितीत हे शुल्क परत मिळणार नाही. तसेच हे परिक्षा शुल्क अन्य उमेदवारांच्या नावे अहस्तांतरणीय आहे. |
| परिक्षा शुल्क | :- | खुल्या प्रवर्गासाठी रुपये ५००/- + बॅंकेकडून आकारण्यात येणारे सेवा शुल्क आणि मागासवर्गीयांसाठी रुपये ४००/- + बॅंकेकडून आकारण्यात येणारे सेवा शुल्क. |

प्राप्त अर्जाच्या छाननीनंतर उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार केली जाईल. गुणवत्ता यादी अंतिम बी.ए.एम.एस.वर्षाच्या गुण टक्केवारीच्या ४० टक्के गुण + संबंधित विषयाच्या गुण टक्केवारीच्या ३० टक्के गुण या सुत्रानुसार तयार केली जाईल. उपलब्ध पदसंख्येनुसार १:५ या प्रमाणात मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची विषयनिहाय गुणवत्ता यादी आयुष संचालनालयाच्या www.mahayush.gov.in या वेबसाईटवर दिनांक २७.११.२०१५ रोजी प्रसिध्द करण्यात येईल.

मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांनी खाली दर्शविल्याप्रमाणे विषयनिहाय मुलाखतीचे दिवशी रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु), वरळी, डॉ.ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई - १८ या ठिकाणी सकाळी ९.०० वाजता स्वखर्चाने उपस्थित रहावे. यासाठी वेगळयाने मुलाखत पत्र दिले जाणार नाही. मुलाखत एकूण ३० गुणांची राहील.

| अ.क्र. | विषय | मुलाखतीचा दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १ | शरिररचना | दिनांक २.१२.२०१५<br>सकाळी ९.०० पासून |
| २ | रसशास्त्र | |
| ३ | रोगनिदान | |
| ४ | स्वस्थवृत्त | |
| ५ | अगदतंत्र | दिनांक ३.१२.२०१५<br>सकाळी ९.०० पासून |
| ६ | प्रसुतितंत्र | |
| ७ | कौमारभृत्य | |
| ८ | शालाक्यतंत्र | |

संचालक
आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य

अर्जाचा नमुना

आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई – ४०० ००१

शासकीय आयुर्वेद महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक (.............विषयाचे नांव)

<u>या पदावरील १२० दिसांच्या तात्पुरत्या नेंमणूकीसाठी अर्ज</u>

| पासपोर्ट आकाराचा फोटो स्वतःच्या स्वाक्षरीसह |
|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) संपूर्ण नाव | :– | आडनाव | स्वतःचे नाव | वडिलांचे/पतीचे नाव |
| २) पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता | :– | पिनकोड | दुरध्वनी क्रमांक एसटीडी कोडसह | |
| | | | मोबाईल क्रमांक | |
| | | | ई-मेल | |
| ३) जन्मदिनांक | :– | वर्ष | महिने | दिवस |
| ४) दिनांक २१.११.२०१५ रोजीचे वय | :– | वर्ष | महिने | दिवस |
| ५) राष्ट्रीयत्व | :– | | | |
| ६) अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी आहे का | :– | | | |

७) ज्या प्रवर्गासाठी अर्ज करावयाचा आहे त्या ठिकाणी (✓) अशी खुण करावी. एकापेक्षा जास्त खुणा केल्यास अर्ज बाद समजला जाईल.

अ.जा. (SC) अ.ज. (ST) वि.जा.(अ) (VJ-A) खुला (OPEN)

८) शैक्षणिक अर्हता :–

| अ.क्र. | बोर्डाचे /विद्यपीठाचे नाव | उत्तीर्ण केलेल्या परीक्षा | उत्तीर्ण केल्याचे वर्ष |
|---|---|---|---|
| १. | | प्रथम बी.ए.एम.एस | |
| २. | | व्दितीय बी.ए.एम.एस | |
| ३. | | तृतीय बी.ए.एम.एस | |
| ४. | | एम.डी/एम.एस आयुर्वेद | |
| ५. | | पीएचडी अर्हता | |

९) अंतिम वर्ष बी.ए.एम.एस व संबंधित विषयातील गुणांची टक्केवारी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ) अंतिम बी.ए.एम.एस. वर्षाचे गुण | प्राप्त गुण | एकूण गुण | टक्केवारी | प्राप्त टक्केवारीच्या ४० टक्के गुण |
| ब) संबंधित विषयातील गुण | प्राप्त गुण | एकूण गुण | टक्केवारी | प्राप्त टक्केवारीच्या ३० टक्के गुण |

क) गुणवत्ता यादीसाठी एकूण गुण
(अ + ब)

१०) एम.सी.आय.एम.चा नोंदणी क्रमांक :-

११) अवगत असणा-या भाषा :- (योग्य ठिकाणी (✓) अशी खूण करावी.)

मराठी हिंदी इंग्रजी संस्कृत /अन्य

१२) अर्जासोबत खालील प्रमाणपत्रे अपलोड करणे अनिवार्य आहे. (होय/नाही (✓) करावे)

| अ.क्र. | | होय | नाही |
|---|---|---|---|
| १. | जन्मतारखेच्या पुष्ठयर्थ जन्मतारखेचा दाखला किंवा एस.एस.सी. प्रमाणपत्र | | |
| २. | प्रथम, व्दितिय, अंतिम बी.ए.एम.एस. परिक्षेच्या गुणपत्रिका /प्रमाणपत्र | | |
| ३. | संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र | | |
| ४. | पीएचडी अर्हता असल्याबाबतचे प्रमाणपत्र | | |
| ५. | संगणक हाताळणीबाबतचे शासन मान्य संस्थेचे प्रमाणपत्र | | |
| ६. | एम.सी.आय.एम.चे नोंदणी प्रमाणपत्र | | |
| ७. | जाती प्रमाणपत्र* | | |
| ८. | जात वैधता प्रमाणपत्र* | | |
| ९. | उन्नत गटात मोडत नसल्याचे अद्ययावत प्रमाणपत्र* (अनुसूचित जाती / अनुसुचित जमातीचे उमेदवाराव्यतिरिक्त) | | |

* मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या पदावर अर्ज करणा-या उमेदवाराने जाती प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र व नॉन-क्रिमीलेअरची साक्षांकित प्रती अपलोड करणे अनिवार्य आहे. सदर प्रमाणपत्रे अपलोड केलेली नसल्यास सदर उमेदवारांचा गुणवत्ता यादी व मुलाखतीसाठी विचार केला जाणार नाही.

## प्रतिज्ञापत्र

मी असे प्रमाणित करतो/करते की, आपल्या आस्थापनेवरील सहाय्यक प्राध्यापक पदे भरण्यासंबंधीची जाहिरात मी काळजीपूर्वक वाचली असून सदर जाहिरातीतील अटी व शर्ती मला मान्य आहेत. या अर्जात मी दिलेली सर्व माहिती संपूर्ण खरी व योग्य आहे, असे मी जाहिर करतो/करते. मुलाखतीच्यावेळी उल्लेख केलेली सर्व मुळ प्रमाणपत्रे सादर करावी लागतील याची मला जाणीव आहे. या अर्जात दिलेली माहिती अंतिम आहे व ती माझ्यावर बंधनकारक राहील याची मला जाणीव आहे. यापुढे मी असेही जाहीर करतो/करते की, भविष्यात यापैकी कोणतीही माहिती खोटी किंवा चुकीची आढळल्यास मी शासन सेवेसाठी अपात्र ठरुन कायदेशीर कारवाईसाठी पात्र ठरेन.

ठिकाण :-

दिनांक :- (उमेदवाराचे नांव व स्वाक्षरी)

Filename: advertisement
Directory: E:\Ay-3\Temporary Assistant Professor Appointment-2015
Template: C:\Users\Girish\AppData\Roaming\Microsoft\Templates\Normal.dotm
Title: egkjk"V
Subject:
Author: User
Keywords:
Comments:
Creation Date: 25-11-2009 10:40:00
Change Number: 202
Last Saved On: 26-10-2015 14:50:00
Last Saved By: Girish
Total Editing Time: 682 Minutes
Last Printed On: 26-10-2015 16:17:00
As of Last Complete Printing
Number of Pages: 8 (approx.)
Number of Words: 1,832 (approx.)
Number of Characters: 10,445 (approx.)